**भारतीय विद्या मंदिर, अमरावती** द्वारा संचालित

**भारतीय महाविद्यालय, मोर्शी जिल्हा-अमरावती (119)**

**ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग मोर्शी**

---

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम अहवाल

## प्रस्तावना

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अलीकडे वाचनांशी संबंध येतो म्हणूनच म्हणतात सतत वाचा तरच वाचाल आणि ज्ञानाचे प्रतीक म्हणून संबोधीले जाणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "वाचाल तर वाचाल". आठ अक्षरात आणि तीन शब्दात जीवन जगण्याचा सारच वाचनाशी जोडून वाचनाला आणि पुस्तकाला सर्वात वरचे स्थान दिले आहे. जो वाचत नाही व ज्याला वाचता येत नाही त्यांच्यात काहीच फरक नसतो तरुणांनी करावे पुस्तकांचे व्यसन वाचनाने व्यक्तिमत्त्व पूर्ण होते तर संभाषणाने ते हजरजबाबी व लेख णाने रेखीव होते. ग्रंथ विना छडी न वाजविता रागाने न बघता ग्रंथ आपले गुरु होतात. ते कधीही झोपत नाही कधीही काही लपवून ठेवत नाही. चूक झाली तरी रागावणार नाही अज्ञानाला हसणार नाही. त्यांची भेट हवी तेव्हा हव्या तितक्या वेळा पडते कायमचे मार्गदर्शक उपयुक्त व सहजपणे प्राप्त होणारे पुस्तकांसारखे दुसरे मित्र नाही. ग्रंथा जसा सामान्यांसाठी शिक्षक आहे त्याचप्रमाणे तो शिक्षकांचाही शिक्षक आहे. वाचन हा एक उत्तम संस्कार आहे अनेक श्रेष्ठ लोकांनी तो निष्ठेने जपला. आपले स्वतःचे जीवन तर समृद्ध केलेच परंतु साऱ्या मानव जातीच्या जीवनात आनंद निर्माण केला. आईप्रमाणेच पुस्तकांची थोरवी आघात आहे. वाचन हा मनाची मशागत करण्याचा सोपा उपाय आहे. माणूस माणसाला वैर होऊ शकतो पूस्तके मात्र अखंड मैत्रीच करतात. माणसे जातात पण पूस्तके राहतात दूरदर्शन, चित्रपट, आकाशवाणी ही पुस्तकांना पूरक साधने, ती पर्यायी साधने कधीही होऊ शकणार नाही का वाचावे याला महत्त्व आहे. तसेच कसे वाचावे यालाही मानसशास्त्रीय तितकेच महत्त्व आहे.

मानवी जीवनाला पुस्तक दिशा दाखवतात, आनंदाच्या वाटा समोर खुल्या करतात, अनेकदा तर चांगला पुस्तक चांगल्या लेखनाला जन्म देतो. पुस्तक विचार देतात विचार करायला शिकवतात चांगलं वाचल्यावर कुठली तर दिव्य अनुभूती प्राप्त झाल्यासारखं

वाटतं मन ताजं टवटवीत होतं खुलत मोकळं होतं मनावरचा ताण हलका होतो जगावं कसं, वागावं कसं, बोलावं कसं, कृती कशी करावी, का करावी, कोणी करावी, ती कृती मीच का करावी, याचा विचार मनात उतरत जातो तो वाचनातील ओळीमधून शब्दामधून मग 'शब्दा वाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडले' असा अनुभव जीवनात ठाई ठाई येतो. मग तेच मन पुन्हा पुन्हा आवडतं ते पुस्तकांच्या दिशेला, प्रत्येक वेळी दुःख, कष्ट, समस्या, प्रश्न, चिंता, घोर आपत्ती, संकट समोर टाकायला लागतात. मनाच्या विविध अवस्थांमध्ये पुस्तके सोबती असतात. पण कोणती पुस्तके कोणत्या पुस्तकांनी हा अनुभव येतो ते लेखक कोण अशी ताकदीची व ताकद असणारी पुस्तके कोणती, ही वाट कोण दाखवणार, कोण गुरु होणार अशा पद्धतीने पुस्तकांची यादी तयार असते.

"ग्रंथ वाचता ही तारतम्य ठेवावे
कोणत्या ग्रंथातून काय घ्यावे
काय सोडावे काय आचरावे
उन्नतीसाठी आपल्या"

हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सांगितलेले वाचनाचे भान प्रत्येक वाचकांनी ठेवणे तेवढेच आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक २०२४ ई ९०५२२ समन्वय दिनांक 20 डिसेंबर २०२४ च्या परिपत्रकांन्वये वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभिनव उपक्रम सुरू करून वाचन संस्कृती जपण्याचा आणि तरुण पिढीला वाचते करण्याचा प्रयत्न करण्यात आला. वाचन उपक्रमाच्या माध्यमातून वाचन शिक्षणापूरते किंवा पाठ्यपुस्तकापूरते मर्यादित न राहता व्यक्तिमत्व विकासासाठी आणि जीवनाच्या विविध पैलूंना समृद्ध करण्यासाठी हा उपक्रम आधार ठरावा. इंटरनेट आणि मोबाईलच्या युगात वाचनाकडे नवी पिढी पाठ न फिरविता वाचनांचा आनंद घेता यावा, वाचनाने ज्ञानाच्या कक्षा रुंदावत जाव्या हा यामागील सकारात्मक दृष्टिकोन असावा. या परिपत्रकांन्वये महाविद्यालयात समितीची स्थापना करून त्यामध्ये भाषाशास्त्र प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्राध्यापकांना समितीमध्ये महत्वाचे स्थान देण्यात आले. जेणेकरून विद्यार्थ्यांचा वाचनाकडे कल वाढावा. सोबतच वाचनाला उपयुक्त अशी वातावरण निर्मिती करता यावी. याकरिता **ग्रंथ प्रदर्शनी, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचक लेखक परिसंवाद आणि पुस्तक परीक्षण स्पर्धा** आयोजित करण्यात आल्या. ज्यामुळे विद्यार्थ्यांचा आणि पूस्तकांचा संपर्क वाढण्यास मदत झाली. सोबतच नवीन वर्षाच्या मंगलमय पर्वावर सामूहिक वाचन राबवून २०२५ या

नववर्षाची सुरुवात वाचण्याची शपथ घेऊन व पुस्तकाला हाताशी पकडून पुढील पिढी वाचन प्रिय बनण्यास हा उपक्रम निश्चितच दिशादर्शक ठरेल.

### **"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमाचा उद्देश**

- विद्यार्थी युवा आणि शिक्षक यांच्यात वाचनाची गोडी वाढवणे.
- वाचन संस्कार रुजवणे.
- वाचनाच्या माध्यमातून ज्ञानसंपन्न समाज उभा करणे.
- वाचनातून समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे.


### **"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" उपक्रमां अंतर्गत राबविण्यात आलेले उपक्रम**

वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम शासन परिपत्रक क्र. संकीर्ण- २०२४/ ई-९०२२२१/समन्वय/दिनांक २० डिसेंबर २०२४ आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती विद्यार्थी विकास विभाग क्र. संगाबाअवि/१३-विवि/२७७/२०२४ दिनांक २१.१२.२०२४ च्या पत्रान्वये भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाद्वारे खालील उपक्रम राबविण्यात आले.

## समिती स्थापना

1. दिनांक २६ डिसेंबर २०२४ ला वाचन संकल्प महाराष्ट्राचा समितीची ऑफलाईन सभा घेण्यात आली. त्यामध्ये विध्यार्थ्यांना वाचन सवय लागावी याकरिता शासनाने दिलेल्या उपक्रमा व्यतिरिक्त कोण कोणते उपक्रम राबवावे व कश्यापध्यतीने राबवावे यासंदर्भात सभेमध्ये उहापोह करून पुढील उपक्रमाची दिशा ठरविण्यात आली.

## समिती स्थापना



Bharatiya Vidyamandir Amravati's
BHARATIYAMAHAVIDYALAYA, MORSHI
(Dist. Amravati)
(444 905)
NAAC Re-Accredited "B" Grade
Phone No. 07228-222242
Fax. No. 07228-222242
Website: bmvmorshi.org
Email:bmvmorshi@rediffmail.com

Dr. R. G. Bambole
M.A., Ph.D. ,NET
Principal

No:/bmvm/LIB/Reading/24-25
Date :23 /12/2024


**"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" उपक्रम महाविद्यालयीन समिती**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महराष्ट्र शासन, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांचे परिपत्रक शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -२०२४/ई-९०५२२१/समन्वय दिनांक २० डिसेंबर २०२४.

| अ. क्र. | नाव | पद | |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. रजनीश जी. बांबोळे | प्राचार्य | |
| 2 | प्रा. अरविंद एस. पाझारे | ग्रंथपाल | |
| 3 | डॉ. सुरेश बी. बीजवे | भाषा शिक्षक | व. म. इंग्रजी |
| 4 | प्रा. भगवान जे. साबळे | भाषा शिक्षक | व. म. मराठी |
| 5 | डॉ. एल.आर. टेम्भूर्णे | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | |
| 6 | प्रा. विनायक देशपांडे | भाषा शिक्षक | क.म. मराठी |

Principal
Bharatiya Mahavidyalaya,
Morshi,Dist.Amravati(M.S.)

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम समिती सभा फोटो









# ग्रंथालय स्वच्छता

2. दिनांक २९ डिसेंबर २०२४ ला विद्यार्थ्यांकडून ग्रंथालयांची स्वच्यता करण्यात आली. त्यामध्ये ५१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यासंदर्भातील छायाचित्र संकेत स्थळ व सामाजिक माध्यमावर प्रसारित करण्यात आले.

Link: https://bmvmorshi.ac.in/pages/library_clean.php

Facebook : https://www.facebook.com/arvind.pazare.9






# ग्रंथालयाची स्वच्छता करताना विद्यार्थी







# ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन

3. दिनांक ३०.१२. २०२४ ते ३१.१२.२०२४ ला दोन दिवसीय ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील वाचन कक्षामध्ये घेण्यात आले. सदर ग्रंथ प्रदर्शनी मध्ये संदर्भ ग्रंथ ठेवण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनीचे उदघाट्न व मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रजनीश बांबोळे यांनी केले. तर विद्यार्थ्यांना साधे ग्रंथ व संदर्भ ग्रंथ यातील फरक, संदर्भ ग्रंथात कशी माहिती पाहायची, ते घरी वाचण्यास का दिले जात नाही , आपण प्रदर्शनीला संदर्भ ग्रंथ का निवडले यासंदर्भात ग्रंथपाल अरविंद संभाजी पाझारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ग्रंथप्रदर्शनीचा एकूण १८७ विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, तासिका प्राध्यापक यांनी लाभ घेतला. त्यासंदर्भातील छायाचित्र संकेत स्थळ व सामाजिक माध्यमावर प्रसारित करण्यात आले.

LINK : https://bmvmorshi.ac.in/pages/granth_pradarshani.php
facebook : https://www.facebook.com/arvind.pazare.9






## ग्रंथप्रदर्शनीतील ग्रंथ चाळताना वाचक







**मार्गदर्शन करताना ग्रंथपाल अरविंद पाझारे**

# ग्रंथप्रदर्शनी उपक्रमाचे फोटो













## वाचन कौशल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन उपक्रम

4. दिनांक ०१.०१.२०२५ ला निरंतर व सतत वाचनाची सवय लागावी यासाठी कोणती पुस्तके वाचावीत/ कशी वाचावीत याबाबत मार्गदर्शन करणारी **वाचन कौशल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन उपक्रम** नवीन वर्षाच्या मंगलमय दिनी घेण्यात आला. कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून डॉक्टर रजनीश गोवर्धन बांबोळे प्राचार्य भारतीय महाविद्यालय मोर्शी तर व्याख्याते म्हणून डॉ. संदीप राऊत इतिहास विभाग प्रमुख व प्रा. पळसापूरे मॅडम ह्या होत्या प्रमुख उपस्थिती डॉ. लांजवंती टेंभुरने, डॉ.शिरीष टोपरे, प्रा. दीपक काळे, प्रा. चिखले, प्रा.वाहने, श्री रुपेश मेश्राम ग्रंथ निवड समिती सदस्य महाराष्ट्र राज्य हे उपस्थित होते. सुरुवातीला सर्व उपस्थितांना वाचनाची शपथ ग्रंथपाल अरविंद एस. पाझारे यांनी दिली. वाचन कौशल्य आत्मसात करून लेखन कौशल्य व सादरीकरण कौशल्य हे वाचनातूनच विकसित होत असते त्यामुळे आज नवीन वर्षाच्या सुरुवातीला झोपण्या अगोदर काही पुस्तकांची पाने वाचूनच झोप घ्यावी असा संकल्प करावा असे विचार डॉ. संदीप राऊत यांनी मांडले तर प्राध्यापीका पडसापूरे यांनी वाचनाने मानवी जीवन समृद्ध होत असते त्यामुळे आपण वाचनाचा वसा घ्यावा असे विचार मांडले. डॉ. शिरीष टोपरे यांनी पुस्तकासोबतच ग्रंथालयात उपलब्ध ई रिसोर्सेसचे वाचन करावे असे प्रतीपादन केले. प्राचार्य डॉ. रजनीश बांबोळे यांनी अध्यक्षीय विचार व्यक्त करताना वाचन कौशल्य विकसित करण्याकरिता पुस्तकाचे प्रथम पाने समजून घ्या. अभ्यासाची पुस्तके दररोज वाचली तरी तुमच्या ज्ञानात नक्कीच भर पडेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "वाचाल तर वाचाल" म्हटले हे माहितीच आहे पण शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असेही म्हटले त्यांनी शेळी, मेंढीचे दुध न म्हणता वाघिणीचे का म्हटले तर वाघीण ताठ कणा करून चालते ती झुकत नाही तसेच शिक्षणांनी माणसांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन तो ताट मानेने आपले जीवन जगू शकतो. याकरिता शिक्षणासोबत वाचन कौशल्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केलें. कार्यक्रमाचे आयोजन सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सामूहिक वाचन केले. सामूहिक वाचनामध्ये जास्तीत जास्त वेळ वाचन करणाऱ्या कु. धनश्री दिगंबरे बी. ए. भाग १ , कु. वैष्णवी चांनदेकर बी. ए. भाग १, वैभव कैलासराव

धुर्वे बी. ए. भाग १ या विद्यार्थ्यांना गणराज्य द दिनी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कार्यक्रमाची सांगता राष्ट्र गीतांनी झाली


LINK : https://bmvmorshi.ac.in/pages/vachan_kaushlya.php

## वाचन कौशल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन उपक्रम फोटो




**वाचनाची शपथ घेताना उपस्थित मान्यवर व विद्यार्थी**






**अध्यक्षीय विचार व्यक्त करताना डॉ. रजनीश जी. बांबोळे प्राचार्य भारतीय महाविद्यालय, मोर्शी**

**व्याख्याते म्हणून डॉ. संदीप राऊत इतिहास विभाग प्रमुख मार्गदर्शन करताना**






व्याख्यात्या म्हणून प्रा. पळसापुरे मॅडम मार्गदर्शन करताना

व्याख्याते म्हणून डॉ. डॉ. शिरीष टोपरे संचालक, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख मार्गदर्शन




ग्रंथपाल प्रा. अरविंद एस. पाझारे भारतीय महाविद्यालय मोर्शी कार्यशाळेची भूमिका मांडताना

# सामूहिक वाचन करताना सहभागी मान्यवर तथा विद्यार्थी








# न्यूज पेपर कटींग

देशोन्नती

## वाचन कौशल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन कार्यक्रम



देशोन्नती वृत्तसंकलन

**मोर्शी :** स्थानिक भारतीय विद्यामंदिर अमरावतीद्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत वाचन कौशल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन उपक्रम घेण्यात आला. प्रथम ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून डॉ. रजनीश गोवर्धन बांबोळे प्राचार्य भारतीय महाविद्यालय मोर्शी, तर व्याख्याते म्हणून डॉ. संदीप राऊत इतिहास विभागप्रमुख प्रा. पळसापुरे मॅडम उपस्थित होत्या. प्रमुख उपस्थिती डॉ. लांजवंती टेंभुर्णे, डॉ. शिरीष टोपरे, प्रा. दीपक काळे, प्रा. चिखले, प्रा. वाहने, रुपेश मेश्राम ग्रंथ निवड समिती सदस्य महाराष्ट्र राज्य यांची होती. सुरुवातीला सर्व उपस्थितांना वाचनाची शपथ ग्रंथपाल अरविंद एस. पाझारे यांनी दिली.

कार्यक्रमाचे आयोजन, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी केले.

Amravati Edition
Jan 05, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

## वाचन कौशल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन कार्यक्रम संपन्न



अमरावती दि. ३ : स्थानिक भारतीय विद्यामंदिर अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमा अंतर्गत वाचन कौशल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन उपक्रम घेण्यात आला. प्रथम ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून डॉक्टर रजनीश गोवर्धन बांबोळे प्राचार्य भारतीय महाविद्यालय मोर्शी तर व्याख्याते म्हणून डॉ. संदीप राऊत इतिहास विभाग प्रमुख व प्रा. पळसापूरे मॅडम ह्या होत्या प्रमुख उपस्थिती डॉ. लांजवंती टेंभुरने, डॉ.शिरीष टोपरे, प्रा. दीपक काळे, प्रा. चिखले, प्रा.वाहने, श्री रुपेश मेश्राम ग्रंथ निवड समिती सदस्य महाराष्ट्र राज्य हे उपस्थित होते. सुरुवातीला सर्व उपस्थितांना वाचनाची शपथ ग्रंथपाल अरविंद एस. पाझारे यांनी दिली. वाचन कौशल्य आत्मसात करून लेखन कौशल्य व सादरीकरण कौशल्य हे वाचनातूनच विकसित होत असते त्यामुळे आज नवीन वर्षाच्या सुरुवातीला झोपण्या अगोदर काही पुस्तकांची पाने वाचूनच झोप घ्यावी असा संकल्प करावा असे विचार डॉ. संदीप राऊत यांनी मांडले तर प्राध्यापीका पडसापूरे यांनी वाचनाने मानवी जीवन समृद्ध होत असते त्यामुळे आपण वाचनाचा वसा घ्यावा असे विचार मांडले. डॉ. शिरीष टोपरे यांनी पुस्तकासोबतच ग्रंथालयात उपलब्ध ई रिसोर्सेसचे वाचन करावे असे प्रतीपादन केले. प्राचार्य डॉ. रजनीश बांबोळे यांनी अध्यक्षीय विचार व्यक्त करताना वाचन कौशल्य विकसित करण्याकरिता पुस्तकाचे प्रथम पाने समजून घ्या. अभ्यासाची पुस्तके दररोज वाचली तरी तुमच्या ज्ञानात नक्कीच भर पडेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वाचाल तर वाचाल म्हटले हे माहितीच आहे पण शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असेही म्हटले त्यांनी शेडी, मेंढीचे दुध न म्हणता वाघिणीचे का म्हटले तर वाघीण ताठ कणा करून चालते ती झुकत नाही तसेच शिक्षणांनी माणसांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन तो ताट मानेने आपले जीवन जगू शकतो. याकरिता शिक्षणासोबत वाचन कौशल्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केलें. कार्यक्रमाचे आयोजन सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सामूहिक वाचन केले. सामूहिक वाचननामध्ये जास्तीत जास्त वेळ वाचन करणाऱ्या ४ विद्यार्थ्यांचा सत्कार गणराज्य दिनी करण्यात येणार आहे. कार्यक्रमाची सांगता राष्ट्र गीतांनी झाली

Dainik Hindustan 04.01.2025

# वाचन प्रतिज्ञा प्रमाणपत्र


MINISTRY OF CULTURE GOVERNMENT OF INDIA | LIBRARIES | G20 | myGOV मेरी सरकार

वाचन शपथ

प्रमाण-पत्र

**मैं प्रमाणित करता हूं/करती हूं कि,**

Shubham Tawar

ने ज्ञानवर्धन हेतु उत्सुक पाठक बनने और साहित्य की परिवर्तनकारी क्षमता को अंगीकार करने की शपथ ग्रहण की है।

2694294398

January, 01 2025


MINISTRY OF CULTURE GOVERNMENT OF INDIA | LIBRARIES | G20 | myGOV मेरी सरकार

वाचन शपथ

प्रमाण-पत्र


**मैं प्रमाणित करता हूं/करती हूं कि,**

Gayatri Anil Wanthi

ने ज्ञानवर्धन हेतु उत्सुक पाठक बनने और साहित्य की परिवर्तनकारी क्षमता को अंगीकार करने की शपथ ग्रहण की है।

9942335974

January, 01 2025


वाचन शपथ

READING PLEDGE

MINISTRY OF CULTURE GOVERNMENT OF INDIA | LIBRARIES | G20 | myGOV मेरी सरकार

वाचन शपथ

प्रमाण-पत्र

**मैं प्रमाणित करता हूं/करती हूं कि,**

Bhavika Dhanraj Padole

ने ज्ञानवर्धन हेतु उत्सुक पाठक बनने और साहित्य की परिवर्तनकारी क्षमता को अंगीकार करने की शपथ ग्रहण की है।

8974459337


January, 02 2025

## *वाचक लेखक परिसंवाद*

5. दिनांक ०६.०१.२०२५ रोजी भारतीय महाविद्यालयात वाचक लेखक परिसंवाद वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत वाचक लेखक परिसंवाद आयोजित करण्यात आला. परिसंवादाचे आयोजन नियोजन प्राचार्य डॉ. रजनीश बांबोळे भारतीय महाविद्यालय मोर्शी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी केले. परिसंवादामध्ये लेखक डॉ. रजनीश बांबोळे, डॉ. लाजवंती टेंभुर्णे, डॉ. संदीप राऊत, डॉ. भगवान साबळे आणि डॉ. दिपाली देशमुख सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी लेखकांना समर्पक अशी प्रश्न विचारून त्यांनी एकंदर आपल्या पुस्तक निर्मितीमागील प्रवास सोबतच जीवन जगताना येणाऱ्या अडचणीवर कशाप्रकारे मात केली सोबतच आजच्या मोबाईल आणि सामाजिक माध्यमाच्या युगात लिहिलेल्या पुस्तकांची प्रासंगीतता कशी आहे. ती वाचली तर विद्यार्थ्यांना काय उपयोग होऊ शकेल. ती पुस्तके कशी मिळवावी या संदर्भात उपस्थित लेखक महोदयांनी प्रकाश टाकला निवेदिका म्हणून कु. विदिशा साठवणे बीए भाग 2, व कु. पार्वती आरसीया हयानी लेखकांना प्रश्न विचारून बोलते केले यावेळी विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून लेखकांकडून उत्तरे मिळवली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी केलें. यावेळी प्रा. दीपक काळे, प्रा. गोपाल भलावी, प्रा. पांडे, प्रा. बोरवार प्रा. चव्हाण, प्रा. पाटील , प्रतीक वहिले, मिलिंद रामटेके, अर्चना भागवत, प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर परिसंवादामध्ये चार लेखकांनी सहभाग नोंदविला होता. २८ प्राध्यापक, ८३ विद्यार्थी सहभागी झाले.

Link : https://bmvmorshi.ac.in/pages/lekhak_parisawad.php
https://www.facebook.com/arvind.pazare.9

# वाचक  लेखक परिसंवाद उपक्रम फोटो










GPS Map Camera
Morshi, Maharashtra, India
82h3+4rx, Msh10, Haleem Colony, Hanuman
Nagar, Morshi, Maharashtra 444905, India
Lat 21.327634° Long 78.004568°
06/01/25 10:28 AM GMT +05:30
Google


Keep Silence
शांतता राखा
THE PROPAGATION OF TRUTH AND NONVIOLENCE CAN BE DONE LESS BY BOOKS THAN BY ACTUALLY LIVING ON THOSE


GPS Map Camera
Morshi, Maharashtra, India
82h3+4rx, Msh10, Haleem Colony, Hanuman
Nagar, Morshi, Maharashtra 444905, India
Lat 21.327641° Long 78.004573°
06/01/25 10:25 AM GMT +05:30
Google

# न्यूज पेपर कटींग

Matrubhumi 13.01.2025

## भारतीय महाविद्यालयात वाचक लेखक परिसंवाद

**ता.प्रतिनिधी/१२ जानेवारी**

**मोर्शी :** स्थानिक भारतीय विद्या मंदिर अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत वाचक लेखक परिसंवाद आयोजित करण्यात आला.परिसंवादाचे आयोजन नियोजन प्राचार्य डॉ.रजनीश बांबोळे भारतीय महाविद्यालय मोर्शी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी केले.





परिसंवादामध्ये लेखक डॉ.रजनीश बांबोळे,डॉ. लाजवंती टेंभुर्णे,डॉ. संदीप राऊत,डॉ. भगवान साबळे आणि डॉ.दिपाली देशमुख सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी लेखकांना समर्पक अशी प्रश्न विचारून त्यांनी एकंदर आपल्या पुस्तक निर्मितीमागील प्रवास सोबतच जीवन जगतांना येणाऱ्या अडचणीवर कशाप्रकारे मात केली सोबतच आजच्या मोबाईल आणि सामाजिक माध्यमाच्या युगात लिहिलेल्या पुस्तकांची प्रासंगीतता कशी आहे. ती वाचली तर विद्यार्थ्यांना काय उपयोग होऊ शकेल.ती पुस्तके कशी मिळवावी या संदर्भात उपस्थित लेखक महोदयांनी प्रकाश टाकला. निवेदिका म्हणून कु. विदिशा साठवणे बी ए भाग २,व कु.पार्वती आरसीया ह्यांनी लेखकांना प्रश्न विचारून बोलते केले.यावेळी विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून लेखकांकडून उत्तरे मिळवली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी केले. यावेळी प्रा.दीपक काळे, प्रा.गोपाल भलावी,प्रा. पांडे,प्रा.बोरवार प्रा. चव्हाण,प्रा.पाटील, प्रतीक वहिले,मिलिंद रामटेके,अर्चना भागवत, प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## भारतीय महाविद्यालयात वाचक-लेखक परिसंवाद


Dainik Lokamat
13.01.2025

**मोर्शी :** शहरातील भारतीय महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत वाचक लेखक परिसंवाद आयोजित करण्यात आला. परिसंवादाचे आयोजन नियोजन प्राचार्य रजनीश बांबोळे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी केले. परिसंवादामध्ये लेखक डॉ. रजनीश बांबोळे, डॉ. लाजवंती टेंभुर्णे, डॉ. संदीप राऊत, डॉ. भगवान साबळे आणि डॉ. दीपाली देशमुख सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी लेखकांना समर्पक असे प्रश्न केले. त्यांनी एकंदर पुस्तक निर्मितीमागील प्रवासासोबतच जीवन जगताना अडचणींवर कशाप्रकारे मात केली, यावर प्रकाश टाकला. निवेदक विदिशा साठवणे, पार्वती आरसिया यांनी लेखकांना प्रश्न विचारून बोलते केले. आभार ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी केले. यावेळी प्रा. दीपक काळे, प्रा. गोपाल भलावी, प्रा. पांडे, प्रा. बोरवार, प्रा. चव्हाण, प्रा. पाटील, प्रतीक वहिले, मिलिंद रामटेके, अर्चना भागवत यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.


## *पुस्तक परीक्षण स्पर्धा*

6. दिनांक १६.०१.२०२५ ला पुस्तक परीक्षण स्पर्धेचे आयोजन स्थानिक भारतीय विद्या मंदिर अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे ग्रंथालय व माहिती शास्त्र विभागाद्वारा महाराष्ट्र शासन परिपत्रकांवये वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत पुस्तक परीक्षण स्पर्धा महाविद्यालयाचे प्राचार्य अन्य डॉक्टर रजनीश बांबोडे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या स्पर्धेच्या अनुषंगाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील किंवा आपल्या घरी असलेल्या पुस्तकाला वाचून त्याचे थोडक्यात परीक्षण लिहून ग्रंथालयात जमा करण्यात आले त्याकरिता ग्रंथालयातून पुस्तक परीक्षण आराखडा उपलब्ध करून देण्यात आला त्यात प्रथम ग्रंथांची प्राथमिक माहिती भरण्यात आली. सोबतच विद्यार्थ्यांना पुस्तक परीक्षण व ज्या पुस्तकाचे परीक्षण करण्यात आले त्या पुस्तकाचा जवळ घेऊन फोटो काढून ग्रंथालयातील ग्रुपला पाठविण्यास सांगण्यात आले ज्यामुळे इतर विद्यार्थ्यांना पुस्तक परीक्षण संदर्भात जास्तीत जास्त माहिती व्हावी. एकूण 140 विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण जमा केले त्यातील प्रथम 20 विद्यार्थ्यांचे परीक्षण चाळणी करून चार क्रमांक काढण्यात आले त्यात प्रथम क्रमांक कु. सुहानी बंडू वानखडे बी. ए. भाग १ व कु. अहिल्या देविशाह कवळे बी. ए. भाग १ द्वितीय क्रमांक कु. विदिशा साठवणे बी. ए. भाग २ व कु. धनश्री दिगंबरे बि. ए. भाग १ तृतीय क्रमांक कु. नंदिनी सतीशराव गुल्हाने बि. कॉम भाग १ व कु. मोहिनी पुंडलिकराव कोहळे बि. एस्सी. भाग १ तर उत्तेजनार्थ कु. गायत्री अनिल वरठी बी. ए. भाग १ ह्यांना निवडण्यात आले परीक्षक म्हणून भाषा शास्त्राच्या प्राध्यापिका डॉक्टर दिपाली देशमुख व प्राध्यापिका वैशाली पळसापुरे यांनी काम पाहिले पुस्तक परीक्षण कशा पद्धतीने लिहायचे कोणता मजकूर असावा या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन स्पर्धेचे आयोजन व नियोजन ग्रंथपाल अरविंद पाजारी यांनी केले प्रतीक वहिले, मिलिंद रामटेके, अर्चना भागवत यांनी याकरिता सहकार्य केले.


# पुस्तक परीक्षण स्पर्धा पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे फोटो





प्रथम पारितोषिक कु. सुहानी बंडू वानखडे




द्वितीय पारितोषिक कु. विदिशा साठवणे



द्वितीय पारितोषिक कु. धनश्री दिगंबरे




तृतिय पारितोषिक कु. मोहिनी कोहळे



उत्तेजनार्थ पारितोषिक कु. गायत्री वरठी

# न्यूज पेपर कटींग

**देशोन्नती**

## भारतीय महाविद्यालयात पुस्तक परीक्षण स्पर्धा

### विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

देशोन्नती वृत्तसंकलन

**मोर्शी :** स्थानिक भारतीय विद्यामंदिर अमरावतीद्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे ग्रंथालय व माहिती शास्त्र विभागाद्वारा महाराष्ट्र शासन परिपत्रकांप्रमाणे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत पुस्तक परीक्षण स्पर्धा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रजनीश बांबोळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

स्पर्धेकरिता एकूण १४० विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण लिहून ग्रंथालयात जमा केले. त्यातील प्रथम २० विद्यार्थ्यांचे ग्रंथ परीक्षण चाळणी करून चार क्रमांक काढण्यात आले. त्यात प्रथम क्र. कु. सुहानी बंडू वानखडे बी.ए. भाग १ व कु. अहिल्या देविशाह कवळे बी.ए. भाग १ द्वितीय क्र., कु. विदिशा साठवणे व कु. धनश्री दिगंबरे बी.ए. भाग २ तृतीय क्र., कु. नंदिनी सतीशराव गुल्हाने बी.कॉम भाग १ व कु. मोहिनी पुंडलिकराव कोहळे बी.एस्सी. भाग १ तर उत्तेजनार्थ कु. गायत्री अनिल वरठी बी.ए. भाग १ यांना निवडण्यात आले.





परीक्षक म्हणून भाषा शास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. दीपाली एस. देशमुख व वैशाली पळसापुरे यांनी काम पाहिले. पुस्तक परीक्षण कशा पद्धतीने लिहायचे, कोणता मजकूर असावा, यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन स्पर्धेचे आयोजन व नियोजन ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रतीक वहिले, मिलिंद रामटेके, अर्चना भागवत यांनी सहकार्य केले.

---

**दैनिक हिंदुस्थान १८.०१.२०२५**

## पुस्तक परीक्षण स्पर्धेचे आयोजन

अमरावती दि. १७ : स्थानिक भारतीय विद्या मंदिर अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे ग्रंथालय व माहिती शास्त्र विभागाद्वारा महाराष्ट्र शासन परिपत्रकांप्रमाणे वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत पुस्तक परीक्षण स्पर्धा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रजनीश बी. बांबोळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या स्पर्धेच्या अनुषंगाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील किंवा आपल्या घरी असलेल्या पुस्तकाला वाचून त्याचे थोडक्यात परीक्षण लिहून ग्रंथालयात जमा करण्यात आले त्याकरिता ग्रंथालयातून पुस्तक परीक्षण आराखडा उपलब्ध करून देण्यात आला. त्यात प्रथम ग्रंथांची प्राथमिक माहिती भरण्यात आली. सोबतच विद्यार्थ्यांना पुस्तक परीक्षण व ज्या पुस्तकाचे परीक्षण करण्यात आले त्या पुस्तकाचा



जवळ घेऊन फोटो काढून ग्रंथालयातील ग्रुपला पाठविण्यास सांगण्यात आले ज्यामुळे इतर विद्यार्थ्यांना पुस्तक परीक्षण संदर्भात जास्तीत जास्त माहिती व्हावी. स्पर्धेकरता एकूण १४० विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण लिहून ग्रंथालयात जमा केले. त्यातील प्रथम २० विद्यार्थ्यांचे ग्रंथ परीक्षण चाळणी करून चार क्रमांक काढण्यात आले त्यात प्रथम क्रमांक कु. सुहानी बंडू वानखडे बी. ए. भाग १ व कु. अहिल्या देविशाह कवळे बी. ए. भाग १ द्वितीय क्रमांक कु. विदिशा साठवणे व कु. धनश्री दिगंबरे बी. ए. भाग २ तृतीय क्रमांक कु. नंदिनी सतीशराव गुल्हाने बि. कॉम भाग १ व कु. मोहिनी पुंडलिकराव कोहळे बि. एस्सी. भाग १ तर उत्तेजनार्थ कु. गायत्री अनिल वरठी बी. ए. भाग १ ह्यांना निवडण्यात आले परीक्षक म्हणून भाषाशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. दिपाली एस. देशमुख व प्राध्यापिका वैशाली पळसापुरे मॅडम यांनी काम पाहिले पुस्तक परीक्षण कशा पद्धतीने लिहायचे कोणता मजकूर असावा या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन स्पर्धेचे आयोजन व नियोजन ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी केले. प्रतीक वहिले, मिलिंद रामटेके, अर्चना भागवत यांनी याकरिता सहकार्य केले.

---

**नवराष्ट्र**

www.navarashtra.com

## ...रतीय महाविद्यालयात पुस्तक परीक्षण स्पर्ध...

**मोर्शी,** (श.प्र.). स्थानिक भारतीय महाविद्यालयाच्या ग्रंथालय व माहिती शास्त्रविभागाद्वारा 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत पुस्तक परीक्षण स्पर्धा प्राचार्य डॉ. रजनीश बांबोळे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली.

... स्पर्धेच्या अनुषंगाने महाविद्यालयातील ...द्यार्थ्यांना ग्रंथालयातील किंवा आपल्या ... असलेल्या पुस्तकाला वाचून त्याचे ...त परीक्षण लिहून ग्रंथालयात जमा ...आले. त्याकरिता ग्रंथालयातून ... आराखडा उपलब्ध करून ...यात प्रथम ग्रंथांची ... आली. सोबतच ... व ज्या



पुस्तकाचा जवळ घेऊन फोटो काढून ग्रंथालयातील ग्रुपला पाठविण्यास सांगण्यात आले. त्यामुळे इतर विद्यार्थ्यांना पुस्तक परीक्षण संदर्भात जास्तीत जास्त माहिती व्हावी. स्पर्धेकरिता एकूण 140 विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण लिहून ग्रंथालयात जमा केले. त्यातील प्रथम 20 विद्यार्थ्यांचे ग्रंथ परीक्षण चाळणी करून चार क्रमांक काढण्यात आले. त्यात प्रथम क्र. सुहानी बंडू वानखडे बी.ए. भाग 1 व अहिल्या देविशाह कवळे बी.ए. भाग 1 द्वितीय क्र. विदिशा साठवणे व धनश्री दिगंबरे बी.ए. भाग 2 तृतीय क्र. नंदिनी सतीशराव गुल्हाने बि.कॉम भाग 1 व मोहिनी पुंडलिक कोहळे बि.एस्सी. भाग ... तर उत्तेजनार्थ गायत्री अनिल वरठी बी... भाग 1 ह्यांना प्राप्त आले. परीक्षक ... भाषा शास्त्राच्या प्राध्यापिका डॉ... एस. देशमुख व वैशाली प... काम पाहिले. पुस्तक ... पद्धतीने लिहायचे ... या संदर्भा...

# श्री शिवाजी हायस्कूल मोर्शी येथील विद्यार्थ्यांची ग्रंथालय भेट

7. भारतीय महाविद्यालय ग्रंथालयाला विद्यार्थ्यांची सस्नेह भेट. स्थानिक भारतीय विद्या मंदिर अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील ग्रंथालय व ज्ञानस्त्रोत केंद्राला श्री शिवाजी हायस्कूल मोर्शी येथील विद्यार्थ्यांनी भेट दिली श्री शिवाजी हायस्कूल मोर्शी येथील विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण शिक्षणातील झालेले बदल माहिती व्हावे याकरिता कार्यशाळेला आमंत्रित करण्यात आले होते त्यावेळी ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी शाळेचे शिक्षक श्री भागवत सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी कार्यशाळेला आलेले होते त्यांना सध्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम ग्रंथालयाच्या वतीने चालू असल्याने विद्यार्थ्यांना ग्रंथालय भेट घडवावी अशी विनंती केली. सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालय भेटीत ग्रंथालयातील विविध ग्रंथांचा परिचय, ग्रंथालयात चालणारे कामकाज, विविध सेवा, संगणकावर चालणारे कामकाज, सोबतच आपण पाठ्यपुस्तका सोबत अवांतर पुस्तके व वर्तमान पत्रे वाचल्यास होणारे सकारात्मक बदल या संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती ग्रंथपाल अरविंद एस. पाझारे यांनी दिली. सोबतच तुम्हाला पुस्तके वाचावयाची असल्यास आमच्या ग्रंथालयाचा उपयोग घ्यावा असे विद्यार्थ्यांना सांगितले यावेळी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षक श्री भागवत सर उपस्थित होते. सोबतच प्रतीक वहिले मिलिंद रामटेके अर्चना भागवत व श्री शिवाजी हायस्कूल येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते















GPS Map Camera
Morshi, Maharashtra, India
82h3+4rx, Msh10, Haleem Colony, Hanuman Nagar, Morshi, Maharashtra 444905, India
Lat 21.327627° Long 78.00458°
10/01/25 02:17 PM GMT +05:30
Google

# न्यूज पेपर कटींग

**देशोन्नती**

## ‘शिवाजी’च्या चिमुकल्यांची भारतीय महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला भेट

देशोन्नती वृत्तसंकलन



**मोर्शी :** स्थानिक भारतीय विद्यामंदिर अमरावतीद्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील ग्रंथालय व ज्ञानस्त्रोत केंद्राला श्री शिवाजी हायस्कूल, मोर्शी येथील विद्यार्थ्यांनी भेट दिली. श्री शिवाजी हायस्कूल, मोर्शी येथील विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण शिक्षणातील झालेले बदल यांची माहिती व्हावी, याकरिता कार्यशाळेला आमंत्रित करण्यात आले होते.

यावेळी श्री शिवाजी हायस्कूल, मोर्शी शाळेचे शिक्षक भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी कार्यशाळेला आले होते.

यावेळी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षक भागवत, प्रतीक वहिले, मिलिंद रामटेके, अर्चना भागवत व श्री शिवाजी हायस्कूल येथील विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते. **(ता. प्र.)**

---

**दैनिक हिंदुस्थान 17.1.25**

## भारतीय महाविद्यालय ग्रंथालयाला विद्यार्थ्यांची सस्नेह भेट



अमरावती दि. १६ : स्थानिक भारतीय विद्या मंदिर अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील ग्रंथालय व ज्ञानस्रोत केंद्राला श्री शिवाजी हायस्कूल मोर्शी येथील विद्यार्थ्यांनी भेट दिली श्री शिवाजी हायस्कूल मोर्शी येथील विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण शिक्षणातील झालेले बदल माहिती व्हावे याकरिता कार्यशाळेला आमंत्रित करण्यात आले होते त्यावेळी ग्रंथपाल अरविंद पाझारे यांनी शाळेचे शिक्षक श्री भागवत सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी कार्यशाळेला आलेले होते त्यांना सध्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम ग्रंथालयाच्या वतीने चालू असल्याने विद्यार्थ्यांना ग्रंथालय भेट घडवावी अशी विनंती केली. सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालय भेटीत ग्रंथालयातील विविध ग्रंथांचा परिचय, ग्रंथालयात चालणारे कामकाज, विविध सेवा, संगणकावर चालणारे कामकाज, सोबतच आपण पाठ्यपुस्तका सोबत अवांतर पुस्तके व वर्तमान पत्रे वाचल्यास होणारे सकारात्मक बदल या संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती ग्रंथपाल अरविंद एस. पाझारे यांनी दिली. सोबतच तुम्हाला पुस्तके वाचावयाची असल्यास आमच्या ग्रंथालयाचा उपयोग घ्यावा असे विद्यार्थ्यांना सांगितले यावेळी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षक श्री भागवत सर उपस्थित होते. सोबतच प्रतीक वहिले मिलिंद रामटेके अर्चना भागवत व श्री शिवाजी हायस्कूल येथील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

---

**जनमाध्यम 17.01.2025**

## भारतीय महाविद्यालयातील ग्रंथालयाला विद्यार्थ्यांची भेट

**मोर्शी/प्रतिनिधीः-** स्थानिक भारतीय विद्या मंदिर अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील ग्रंथालय व ज्ञानस्त्रोत केंद्राला श्री शिवाजी हायस्कूल मोर्शी येथील विद्यार्थ्यांनी भेट दिली. श्री शिवाजी हायस्कूल मोर्शी येथील विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण शिक्षणातील झालेले बदल माहिती व्हावे याकरिता कार्यशाळेला आमंत्रित करण्यात आले होते. ग्रंथपाल अरविंद पाझारे, शाळेचे शिक्षक भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी कार्यशाळेला आलेले होते. त्यांना सध्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम ग्रंथालयाच्या वतीने चालू असल्याने विद्यार्थ्यांना ग्रंथालय भेट घडवावी अशी विनंती केली. सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालय भेटीत ग्रंथालयातील विविध ग्रंथांचा परिचय, ग्रंथालयात चालणारे कामकाज, विविध सेवा, संगणकावर चालणारे कामकाज, सोबतच आपण पाठ्यपुस्तका सोबत अवांतर पुस्तके व वर्तमान पत्रे वाचल्यास होणारे सकारात्मक बदल या संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती ग्रंथपाल अरविंद एस. पाझारे यांनी दिली. तसेच तुम्हाला पुस्तके वाचावयाची असल्यास आमच्या ग्रंथालयाचा उपयोग घ्यावा असे विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षक भागवत, प्रतीक वहिले, मिलिंद रामटेके, अर्चना भागवत व श्री शिवाजी हायस्कूल येथील. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

